नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 16/10/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. भिवापुर :– दिनांक 11/11/2017 चे 23.01 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे अप. क्र. 284/2017 कलम 354(अ), 376, 511 भादवी सहकलम 7,8,9,10 बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 11/11/2017 चे 16:30 वा. सुमारास फिर्यादी यांचा मुलगा व मुलगी गावातील शाळेच्या आवारात खेळण्या करीता गेले असता लपन छपून खेळत असता यातील आरोपी नामे– संदीप मारोतीराव लांडे, वय 27 वर्ष, रा. जवाळी, त. भिवापुर, जि. नागपूर याने फिर्यादीची मुलगी/पीडिता वय 6 वर्ष हिच्या सोबत बळजबरीने लैंगिक अत्याचार केला. आरोपीला दिनांक 12/11/2017 चे 01.34 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. शिवशंकर तिवारी, पो.स्टे. भिवापुर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 16/10/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. के. जी. राठी, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला 1) कलम 9 (आय) (एम), 10 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये मध्ये 5 वर्ष सश्रम कारावास व 2,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 4 महिने शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, पोहवा श्री. शेखर मेश्राम, मंगेश वाघ, मनोज तिवारी, सुनिल डोंगरे यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर